लोकसत्ता चळवळ

## मीडिया रिलीज

# "हिशोब द्या मोहिम"

## (नगरसेवकांना थेट नागरिकांच्या प्रति उत्तरदायी बनविण्यासाठी)

**पार्श्वभुमि:** मुंबई, 27 फेब्रुवारी 2008

मुंबई शहराच्या समस्या म्हणजे दूरचा विचार न करणारे व सदोष शहरी व्यवस्थापन, भारताच्या ग्रामिण भागाच्या विकासाकडील दूर्लक्ष व त्यामुळे उद्भवलेल्या अनियंत्रित स्थलांतराचे उत्कृष्ट प्रकटीकरण आहे. हया शहरातील 1 कोटी 25 लाख नागरिकांपैकी प्रत्येक जण तणावाखाली जगतो आहे व हाल सोसत आहे. त्यामुळे हयातून सर्वांसाठी फायदेशीर मार्ग शोधण्याची तातडीची गरज आहे. हया संदर्भात 28 जून 2006 रोजी लोकसत्ता चळवळीने शासन व्यवस्थेतील सुधारणांसाठी 'वोट मुंबई' मोहिमेची सुरुवात केली होती. त्यामागील आशा हीच की, भविष्यात (1) 26 जुलै 2005 सारखी परिस्थिती निर्माण न व्हावी, किंवा (2) अशा घटनांमुळे होणारे नुकसान टाळले जावे. हे साध्य करण्यासाठी बी.एम.सी. कायद्यावर आधारित व्यवस्थापनाची मुलभूत रचना व विकास आराखडा (डेव्हलपमेंट प्लॅन) बनविण्याची, त्याचे परिक्षण करण्याची व त्यात बदल करण्याची प्रक्रिया व पद्धतीचा काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक होते.

वोट मुंबई मोहिमेचा मुख्य जोर हया सूचनांवर होता –

1) पारदर्शी स्थानिक सरकार जे नागरिकांना उत्तरदायी असेल – माहिती उघड करण्याची प्रमाणे, परत बोलविण्याचा अधिकार, लोकायुक्त, स्वतंत्र बाहेरील परिक्षक, दंडांची तरतूद असलेली नागरिकांची सनद, सेवेच्या दर्जाचा स्तर ठरविणे, ई–प्रशासन

2) नागरिकांच्या सहभागासाठी कायदेशीर मंच असलेले स्थानिक स्वराज्य – प्रत्येक मतदान कक्षासाठी (पोलिंग बुथ) 'एरिया सभा'

3) स्थानिक सरकारच्या कार्यकारी शाखेचे विकेंद्रीकरण व लोकशाहीकरण – प्रत्येक नगरसेवक वॉर्डसाठी वॉर्ड समिती.

4) नागरिकांना थेट उत्तरदायी असलेले अधिकारप्राप्त स्थानिक सरकार– थेट निवडणुक झालेले महापौर

5) विकास आराखडा तयार करण्याची अधिक चांगली प्रक्रिया – लोकशाही तत्वांवर आधारित महानगर परिसर नियोजन समिती व संयुक्त वाहतुक प्राधिकरण.

हया मोहिमेच्या अंतर्गत वकिली (राजकीय नेते व सरकारी अधिकाऱ्यांबरोबर), पथ नाटये, सहयांची मोहिम (7 लाखांच्या वर) मानवी साखळी (4500 पेक्षा अधिक विद्यार्थी) पत्रकांचे वितरण (2. 5 लाख), सार्वजनिक सभा (1000 पेक्षा अधिक), आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा इत्यादी विविध कार्यक्रम राबविले गेले.

Lok Satta Movement–Base Unit-4, Byculla Service Industries Premises, Dadaoji Kondeo Road (Sussex Road),
Byculla(E)- Mumbai-400027, Tel: 91-22-23772242, 23772284, Fax: 91-22-23772284
Email: loksatta.maharashtrachapter@gmail.com, Web: www.loksattamovement.org

आनंदाची गोष्ट ही की वर दिलेल्या सूचनांपैकी निवडणुक वॉर्ड स्तरावर वॉर्ड समितीची स्थापना, मतदारांना आपल्या वॉर्ड समिती प्रतिनिधीला परत बोलविण्याचा अधिकार व प्रत्येक मतदान कक्षासाठी (पोलिंग बुथ) एरिया सभा, माहिती उघड करण्याची प्रमाणे, महानगर परिसर नियोजन समिती इत्यादी बऱ्याचशा सूचना मान्य झाल्या असून महाराष्ट्र सरकारकडून अंमलबजावणी होण्याच्या मार्गावर आहेत. त्या शिवाय 'थेट निवडणुक झालेले अधिकारप्राप्त महापौर' हया सूचनेचा समावेश पंतप्रधानांनी नियुक्त केलेल्या द्वितीय प्रशासकीय सुधारणा मंडळाच्या सहाव्या अहवालात झाला आहे. हया पांच सदस्य असलेल्या मंडळावर एक सदस्य म्हणून लोकसत्ता चळवळीचे प्रतिनिधित्व तिचे प्रमुख नेते डॉ. जयप्रकाश नारायण करत आहेत.

मतदान कक्ष (पोलिंग बुथ) पातळीवर एरिया सभा व निवडणुक वॉर्ड स्तरावर नगरसेवकाच्या अध्यक्षतेखालील वॉर्ड समिती स्थापन करुन नागरिकांना स्थानिक स्वराज्य मिळविण्यासाठी संघटित होण्याची संधी आहे. हे लक्षात घेऊन फेब्रुवारी 2007 मधील मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी वोट जुहू मोहिमेची घोषणा केली गेली. त्यामागील मुख्य उद्देश हा की 1)प्रत्येक मतदान कक्षामधील (पोलिंग बुथ) नागरिकांनी एरिया सभाद्वारे संघटीत होऊन निवडणुकीत विजय मिळविला तर पैशाच्या बळाची व गुन्हेगारीकरणाची राजकीय संस्कृती बदलू शकते. व 2)एरिया सभाच्या माध्यमातून नागरिकांच्या सहभागामुळे जर वॉर्ड कमिटीची स्थापना प्रत्येक निवडणुक वॉर्ड स्तरावर केली गेली तर स्थानिक वॉर्डच्या शासन व्यवस्थेत सुधारणा होऊ शकते. केवळ 75 हजार रुपये खर्च करुन नागरिकांचे उमेदवार श्री. ॲडॉल्फ डिसुझा निवडणुकीत विजयी झाले तेव्हा निवडणुक जिंकण्याचा हा पहिलाच प्रयोग यशस्वी ठरला . हया मोहिमेने दाखवून दिले आहे की, नागरिकांच्या सहभागावर लक्ष केंद्रित केले तर निवडणुक जिंकण्यासाठी पैशाची ताकद व गुन्हेगारांवर अवलंबून राहावे लागणार नाही.

## हिशोब द्या मोहिम

***खऱ्या लोकशाहीमध्ये मतदारांना अधिकार प्राप्त झाले पाहिजे !***

खरे तर लोकशाहीमध्ये मतदारांना केवळ अधिकारप्राप्त असणे पुरेसे नाही, त्यांना प्राप्त अधिकारांची जाणीव झाली पाहिजे. जर ज्ञानामध्ये शक्ति आहे तर, लोकप्रतिनिधी त्यांना दिल्या गेलेल्या सार्वजनिक निधीचा कसा उपयोग करतात हयाबद्दल मतदारांना माहिती देणे हा मतदारांना अधिकारप्राप्त करण्याचा एक मार्ग आहे. एक वर्षापूर्वी मतदारांनी त्यांच्या प्रतिनिधींची '**नगरसेवक**' पदासाठी निवड केली. **नगरसेवकांना** दरवर्षी 35 लाख रु. चा निधी दिला जातो व आपल्या मतदार संघात नागरिकांच्या उपयोगाच्या व कल्याणाच्या कामांसाठी तो निधी वापरण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. हा निधी कशाप्रकारे वापरला जातो व निधीच्या वापराबद्दल निर्णय प्रक्रियेत मतदारांचा सहभाग होता का? हयाबद्दल त्यांच्या वॉर्ड मधील मतदारांना माहिती देणे आवश्यक आहे. वेगळया शब्दात सांगायचे तर, लोकांना समजले पाहिजे की तो निधी वापरण्याचा निर्णय घेण्यापूर्वी लोकांचा सल्ला विचारात घेतला गेला होता की नाही व घेतला गेला असल्यास कसा व किती प्रमाणात?

म्हणूनच, मतदारांच्या वतीने लोकसत्ता चळवळीने प्रत्येक नगरसेवकाला पत्राद्वारे एक प्रश्नांची यादी (प्रत सोबत जोडली आहे) पाठविली आहे. तसेच सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांना पत्र(प्रत सोबत जोडली आहे) पाठविले आहे लोकसत्ता चळवळीची तरुणांसाठी शाखा– युवा सत्ताचे स्वयंसेवक टप्प्या–टप्प्याने सर्व नगरसेवकांना भेटतील. मोहिम समन्वयक 20 वर्षीय अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा विद्यार्थी रुबेन मस्करेनहॅस यांच्या नेतृत्वाखाली काही तरुण स्वयंसेवक रविवार 24 फेब्रुवारीला महापौर श्रीमती शुभा राऊळ (वॉर्ड क्र. 7), श्री. क्लाईव्ह डायस (वॉर्ड क्र. 73), श्री. धर्मेश व्यास (वॉर्ड क्र. 81) व श्री. ॲडॉल्फ डिसुझा (वॉर्ड क्र. 63) हया नगरसेवकांना भेटले व त्यांच्याकडून मोहिमेच्या प्रश्नांच्या यादीला एक आठवडयाच्या कालावधीत उत्तर पाठविण्याचे आश्वासन मिळविले.

नगरसेवकांनी पुरविलेल्या माहितीला किंवा न दिलेल्या प्रतिसादाला व्यापक **प्रसिद्धी** देण्याचा लोकसत्ता चळवळीचा विचार आहे. हया द्वारे मतदारांना सज्ञान व अधिकारप्राप्त करण्याचा तसेच नगरसेवकांना त्यांच्या

मतदारांच्या प्रति उत्तरदायी बनविण्याचा उद्देश आहे.

सहभागी लोकशाही अंमलात आणण्यासाठी हिशोब द्या मोहिम हा एक प्रयास आहे. लोकशाही तत्वावर आधारीत स्वराज्याचे साधन व स्थानिक समाजाला सेवा पुरविणारी संस्था म्हणून स्थानिक स्वराज्याचे महत्व व गरजेबद्दल कुतुहल व जाणीव गेल्या काही वर्षात वाढल्याचे दिसून येत आहे. स्थानिक सरकार हे राष्ट्रीय शासन रचनेशी जुडलेला एक भाग व नागरिकांच्या सर्वात जवळील स्तराचे सरकार आहे. तसेच ते नागरिकांच्या रहाणीमानात सुधारणा करण्याच्या निर्णय प्रक्रियेत त्यांना सामिल करण्यासाठी व एकंदर विकासाला चालना देण्यासाठी नागरिकांच्या ज्ञानाचा व क्षमतेचा उपयोग करण्यासाठी सर्वात योग्य स्थितीत आहे.

## लोकसत्ता चळवळीबद्दल:

लोकसत्ता चळवळ राजकारण व शासनव्यवस्था हया क्षेत्रात व्यापक सुधारणांसाठी लक्षणीय यश मिळविलेली भारतातील प्रमुख सामाजिक संस्था व नागरिकांची चळवळ आहे . वोट इंडिया (www.voteindia.org) ,वोट मुंबई (www.votemumbai.org) व वोट पोलिस (www.votepolice.org) मोहिमांदृवारे विविध संस्थांच्या सहकार्याने लोकसत्ता चळवळ राजकीय व शासनव्यवस्थेतील सुधारणांसाठी काम करत आहे.

हया मोहिमेबद्दल अधिक माहितीसाठी

**कृपया संपर्क करा – रूबेन 9820249942 किंवा सुरेंन्द्र 9867334446**

हिशोब द्या मोहिमेत सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहिती करून घेण्यासाठी नागरिक **loksatta.maharashtrachapter@gmail.com** हया ई–मेलवर
किंवा **दूरघ्वनि कमांक : 0 22 2373 2454** येथे संपर्क साधू शकतात.